# येशू भूतग्रस्त मुलाला बरे करितो

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू आमच्या मुलांनी त्यांची दुष्ट आत्म्यांपासून सुटका होण्यासाठी तुझ्यावर विश्वास ठेवावा असे येशूच्या अधिकाराने व कृपेने होऊ दे.''

मुलांचे वय व गरजांना अनुरूप असे शिक्षणाचे कार्यक्रम निवडा.

मोठे मूल अथवा शिक्षक: येशूने एका मुलाला कसे बरे केले ते **मार्क 9:14-29** मधुन वाचा किंवा सांगा सैतानाच्या सर्व शक्तींवर येशूचे सामर्थ्य आहे हे ह्या वृत्तांतातून दिसते.



वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा *(प्रत्येक प्रश्नाच्या पुढे उत्तरे आहेत)*

- येशू आला तेव्हा शिष्य काय करीत होते? *(उत्तर: प्रार्थना करण्याऐवजी ते आपसात वाद घालत होते. पाहा वचन 14)*
- त्या मुलाला ते भूत कशा प्रकारे त्रास देत असे? *(पाहा वचने 17-18 व 22)*
- सैतानाच्या शक्ती विरूद्ध उभे राहण्यासाठी आम्ही काय केले पाहिजे? *(विश्वास पाहा वचन 23)*
- देवावर विश्वास ठेवण्यास आम्हांला कोण मदत करते? *(पाहा वचन 24)*
- कोणाच्या सामर्थ्याने आम्हांला सैतानाच्या विरूद्ध उभे राहता येते? *(प्रार्थनेच्या द्वारे देवाच्या सामर्थ्याने. पाहा वचन 29)*

मुलाला त्रास देणाऱ्या भूतावर येशूने कसा जय मिळवला ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण करा. उपाराकांच्या मुख्य उपासनेच्या पुढाऱ्यांशी चर्चा करून ही नाटिका सादर करण्याची व्यवस्था करा. मुलांची तयारी करून घेण्यासाठी वेळ द्या. तुम्ही यातील सर्व भूमिका केल्याच पाहिजेत असे नाही. मोठया मुलांनी लहान मुलांची तयारी करून घ्यावी.

- **मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी **निवेदक** आणि **वडील** ह्या भूमिका कराव्यात. **निवेदक:** वृत्तांताचा सारांश तयार करा आणि मुलांना संवाद पाठ करण्यास मदत करा.

**लहान मुलांना मुलगा, आई** आणि **भाऊ** व **बहिणी** ह्या भूमिका द्या.

**निवेदक:** मार्क 9:14-21 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''मुलाचे वडील काय म्हणतात ते ऐका''

**वडील:** ''अगं ऐकले का, मी आलोय आपल्या मुलाकडे बघ!''



**मुलगा:** ''येशूने मला बरे केले! मला त्याला भेटायचे आहे!''

**आई:** ''अहो! हे खरे आहे का? हयाला तर लहानपणा पासूनच ते भूत त्रास देत आहे!''

**भाऊ व बहिणी:** ''ते किती भयंकर होते आम्हांला आठवते ना!''

''त्याच्या तोंडाला फेस येऊन खाली पडत असे!''

''केव्हा केव्हा तर तो विस्तवात किंवा पाण्यातही पडत असे!''

''तो जवळ जवळ मेलाच होता!''

''हे पाहून मला रडूच यायचे!''

**वडील:** ''कोणीही त्याला मदत केली नाही. मी येशूच्या शिष्यांना विचारले पण त्यांना काहीही करता आले नाही.''

**निवेदक:** मार्क 9:23-29 मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगून मग म्हणा, ''वडील काय म्हणतात ते ऐका''

**वडील:** ''मी येशूकडे मदत मागितली आणि त्याने मदत केली.''

**आई:** ''याला बरे करण्यासाठी येशूने काय केले?''

**वडील:** ''प्रथम त्याने मला सांगितले की विश्वास ठेवणाऱ्याला सर्व काही शक्य आहे. पण माझा विश्वास कमकुवत होता म्हणून मला विश्वास ठेवण्यास मदत करण्याची मी त्याला विनंती केली.''

**मुलगा:** ''त्या अशुद्ध आत्म्याने मला खाली पाडून पिळून टाकले त्याने मला मोठयाने किंकाळी मारायला लावली. लोक म्हणाले मी मेलो म्हणून.''

**आई:** मुलाला जवळ घेऊन म्हणा, ''अरेरे, बिचारे बाळ माझे!''

**मुलगा:** ''येशूने त्या आत्म्याला परत कधीही येथे न येण्याविषयी सांगितले. येशूने माझा हात धरून मला उठविले.''

**आई:** ''देवाची स्तुती असो!''

**मुलगा:** ''आता मला नीट बोलता येते!''

**आई:** ''शिष्यांना तुला बरे का करता आले नाही?''

**वडील:** ''येशूने सांगितले की त्यांचा देवाच्या सामर्थ्यावर विश्वास नव्हता आणि ते प्रार्थना करीत नव्हते!''

**भाऊ व बहिणी:** असे म्हणा ''आम्हीही येशूवर विश्वास ठेवणार आहोत.''

''आमचा विश्वास अधिक दृढ करायला आम्ही त्याला सांगणार आहोत.''

''सर्व अशुद्ध आत्म्यापेक्षा येशूचे सामर्थ्य अधिक आहे.''

**निवेदक किंवा मोठा मुलगा:** नाटिका संपल्यावर त्यासाठी साहाय्य करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

मुलांनी ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण प्रौढांसाठी केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी प्रौढांना विचारावेत.

येशूने लोकांना सैतानाच्या शक्तीपासून कोणकोणत्या प्रकारे सोडवले त्याची इतर उदाहरणे मुलांना विचारा. मुलांनी व प्रौढांनी उदाहरणे सांगावीत.

प्रार्थना करणाऱ्या व्यक्तीचे चित्र काढा मुलांना हे चित्र काढायला सांगा.

- उपासनेच्या वेळी मुले त्यांची चित्रे मोठया माणसांना दाखवून येशूच्या सामर्थ्याने आपल्याला सैतानाच्या शक्ती विरूद्ध कसे उभे राहता येते हे यावरून स्पष्ट होते असे सांगतील.
- तुम्हांला वाटले तर मुलांना वर दिलेले पडलेल्या मुलाचे चित्र काढायला किंवा रंगवायला द्या.
- मोठी मुले थडगे प्रेत ठेवण्याची पेटी किंवा कबर अशा मृत्यूच्या प्रतिकांची चित्रे काढतील आणि येशूने फक्त सैतान व दुष्ट आत्म्यांवरच नव्हे तर मरणावरही विजय मिळवला हे स्पष्ट करून सांगतील.



येशू सैतानापासून आमची कशी सुटका करतो याविषयी मोठया मुलांना कविता गीते किंवा नाटिका लिहाव्यात.

कविता. तीन मुलांना स्तोत्र 3:3-5 मधुन प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा.

**पाठ करा. याकोब 4:7**

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, केवळ तूच सर्वसमर्थ आहेस. तू सैतानाच्या शक्तीपासून आमची सुटका करतोस. तुझ्या प्रीतीपासून आम्हांला कोणतीही गोष्ट दूर ठेवू शकत नाही. आम्ही तुझ्यावर प्रेम करतो. आम्ही तुझ्याबद्दल आमच्या मित्रमंडळीला सांगावे यासाठी तू आमचे साहाय्य कर.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net